खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### राष्ट्रीय सेवा योजना : एचआयव्ही जनजागृती



लोकमत

**राजगुरू महाविद्यालयात एचआयव्ही जागृती**

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामीण रुग्णालय, चांडोली यांच्या वतीने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, अल्ताफ पठाण, मुस्कान मोमीन, प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी.एम. मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा. कविता वाळुंज, प्रा. सोनल मांडे व रासेयो विद्यार्थी उपस्थित होते. संतोष नायकोडी यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना असुरक्षित लैंगिक संबंध, यातून प्रसार होऊन एड्सची लागण होत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. गणेश धुमाळ यांनी, तर आभार प्रा. नीता डोंगरे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 07, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# राजगुरुनगरला शिबिरात एचआयव्हीची जागृती



राजगुरुनगर, ता. ८ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि चांडोली (ता. खेड) येथील ग्रामीण रुग्णालय यांच्यावतीने जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबिर आयोजित केले होते.

यावेळी केलेल्या एचआयव्ही तपासणीत सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, मुस्कान मोमीन, प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी. एम. मारकड आदी उपस्थित होते.

असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यांद्वारे एचआयव्ही विषाणूंचा प्रसार होऊन एड्सची लागण होते. विद्यार्थ्यांनी एचआयव्हीसारख्या संसर्गजन्य आजारांपासून जागरूकपणे दूर राहिले पाहिजे, असे नायकोडी यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना सांगितले. संसर्ग झालाच तर लपवून ठेवू नका. एचआयव्हीवर अत्यंत प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध असून, योग्य प्रकारे वैद्यकीय उपचार घेतल्यास रोग आटोक्यात राहतो, असे ते म्हणाले.

Pune, District-Today
09/12/2021 Page No. 5

नवराष्ट्र

# राजगुरू महाविद्यालयात एचआयव्ही जनजागृती

**राजगुरुनगर,** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि चांडोली (ता. खेड) ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने जागतिक ए* दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबीरात सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, अल्ताफ पठाण, मुस्कान मोमीन, प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी. एम. मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा. कविता वाळुंज, प्रा. सोनल मांडे होते. असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यातून ए*ची लागण होत असल्याचे संतोष नायकोडी यांनी सांगितले.

Pune Plus Edition
08 December 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

# एचआयव्हीवर प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध

## समुपदेशक नायकोडी : हुतात्मा राजगुरूनगर महाविद्यालयात जनजागृती



**राजगुरूनगर, दि. ७ (प्रतिनिधी)** - असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यातून एचआयव्ही विषाणूचा प्रसार होऊन एड्सची लागण होते. एचआयव्हीवर अत्यंत प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध असून त्यावर योग्य प्रकारच्या वैद्यकीय काळजी घेण्याची गरज असल्याचे समुपदेशक संतोष नायकोडी यांनी सांगितले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामीण रुग्णालय चांडोली यांच्या वतीने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबिर सोमवारी (दि. ६) पार पडले, त्यावेळी नायकोडी बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, समुपदेशक संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, आरोग्य सेविका मुस्कान मोमीन, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. डी. एम. मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा.कविता वाळुंज, प्रा. सोनल मांडे व रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपापल्या आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती ठेवून एचआयव्ही सारख्या संसर्गजन्य आजारांपासून जागरूकपणे दूर राहण्याचे आवाहन केले. यावेळी करण्यात आलेल्या एचआयव्ही तपासणीत सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी तर प्रा. नीता डोंगरे यांनी आभार मानले.

प्रभात Wed, 08 December 2021
https://epaper.eprabhat.net/c/64826681

जनप्रवास

# राजगुरू महाविद्यालयात एचआयव्ही जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामीण रुग्णालय चांडोली यांच्या वतीने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.६) करण्यात आले.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, समुपदेशक संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, आरोग्य सेविका मुस्कान मोमीन, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ.प्रभाकर जगताप, प्रा.डी.एम.मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा.कविता वाळुंज, प्रा.सोनल मांडे व रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.

संतोष नायकोडी यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यातून एचआयव्ही विषाणूचा प्रसार होऊन एड्सची लागण होत असल्याचे सांगितले. एचआयव्हीवर अत्यंत प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध असून त्यावर योग्य प्रकारच्या वैद्यकीय काळजी संदर्भात त्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपापल्या आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती ठेवून एचआयव्ही सारख्या संसर्गजन्य आजारांपासून जागरूकपणे दूर राहण्याचे आवाहन केले. या यावेळी करण्यात आलेल्या एचआयव्ही तपासणीत सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी तर आभार प्रा.नीता डोंगरे यांनी मानले.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ८ डिसेंबर २०२१

# राजगुरू महाविद्यालयात एचआयव्ही जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामीण रुग्णालय चांडोली यांच्या वतीने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही जनजागृती अभियान आणि तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.६) करण्यात आले.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, समुपदेशक संतोष नायकोडी, हंसराज गायकवाड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, आरोग्य सेविका मुस्कान मोमीन, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नीता डोंगरे, प्रा. गणेश धुमाळ, डॉ.प्रभाकर जगताप, प्रा.डी.एम.मारकड, डॉ. कीर्ती नितनवरे, प्रा.कविता वाळुंज, प्रा.सोनल मांडे व रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.

संतोष नायकोडी यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्त संक्रमण, मातेकडून गर्भाला किंवा स्तनपान करणाऱ्या बाळाला संक्रमण, शिरेतून नशा आणणाऱ्या औषधांचा वापर यातून एचआयव्ही विषाणूचा प्रसार होऊन एड्सची लागण होत असल्याचे सांगितले. एचआयव्हीवर अत्यंत प्रभावी औषधे बाजारात उपलब्ध असून त्यावर योग्य प्रकारच्या वैद्यकीय काळजी संदर्भात त्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपापल्या आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती ठेवून एचआयव्ही सारख्या संसर्गजन्य आजारांपासून जागरूकपणे दूर राहण्याचे आवाहन केले.

या यावेळी करण्यात आलेल्या एचआयव्ही तपासणीत सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. गणेश धुमाळ यांनी तर आभार प्रा.नीता डोंगरे यांनी मानले.

HRM

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**